मित्तल फांऊडेशन ट्रस्ट

# के.जी. मित्तल आयुर्वेद कॉलेज

नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राईव्ह, तारापोरवाला मत्सालय पाठीमागे, मुंबई - ४०० ००२.

[फोन नं. ६९०८८०००/२२८१२८१८ E mail :-kgmpacollege@yahoo.com,kgmpacollege@gmail.com]

संदर्भ :- केजीमिआकॉ /रासेयो/संविधान दिवस/२३३६/२०२४ दिनांक-२७.११.२०२४

प्रति,

मा.संचालक विद्यार्थी कल्याण विभाग,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
वणी दिंडोरी रोड, म्हसरुळ नाशिक.
पिन:- ४२२ ००४.

विषय :- संविधान दिवस अहवााल सादर करण्याबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मआविवि/वि.क./रासेयो/३२८५/२०२४. दि. २५/११/२०२४.

महोदय,

उपरोक्त संदर्भीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडुन प्राप्त निर्देशानुसार संविधान दिवस (अमृत महोत्सवी वर्ष) मित्तल फांऊडेशन ट्रस्टचे सचिव श्री. अरुणजी मित्तल, सल्लागार वैद्य. हरिप्रसाद शर्मासर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य वैद्य. अजय साळुंके व उपप्राचार्या वैद्या. मंगल क्षिरसागर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन रासयो एकक के.जी.मित्तल, आयुर्वेद कॉलेज,मुंबई द्वारा करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासयो प्रतिनिधि प्रिया मिश्रा द्वारे करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीच्या अमृतमहोत्सवी वर्षाप्रसंगाचे औचित्य साधून राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर** यांच्या प्रतिमेला दिपप्रज्वलन व पुष्पार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

महाविद्यालयाच्या यश पटवा हया विद्यार्थ्याने घटना निर्मितीचा इतिहास थोडक्यात मांडला. वैद्या. राजश्री कोलारकर, प्राध्यापक,शल्यतंत्र विभाग व वैद्य.मुकेश शुक्ला, विभागाध्यक्ष व प्राध्यापक, पंचकर्म विभाग यांनी भारतीय राज्यघटनेचे आपल्या जीवनातील महत्व सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य. अजय साळुंके सरांनी भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना असून आपणास राज्यघटनेद्वारे दिलेली मूलभूत हक्के, मार्गदर्शक तत्वे व मुलभूत कर्तव्ये या विषयांवर प्रकाश टाकला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वैद्या. मंगल क्षिरसागर मॅडम यांनी भारतीय राज्यघटनेचे वैभवशाली अमृत वर्षा चे औचित्य साधून राज्यघटना निर्मितीमध्ये ज्या महापुरुषांनी योगदान केले त्यांचे ऋण व्यक्त केले.

रासयो स्वयंसेवक प्रिंन्स मौर्या द्वारा आभारप्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम रासयो अधिकारी वैद्य.जाधव साहेबराव व उपकार्यक्रम अधिकारी वैद्या. प्रियंका भावसार मॅडम यांच्या मार्गदशनाखाली करण्यात आले.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना हया कार्यक्रमामध्ये संविधान प्रतिज्ञा देण्यात आली.

प्रभारी प्राचार्य

प्रभारी प्राचार्य
के. जी. मित्तल आयुर्वेद कॉलेज
नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राईव्ह,
तारापोरवाला मत्सालय पाठीमागे,
मुंबई - ४०० ००२.

# संविधान दिवस













K. G. MITTAL AYURVED COLLEGE

प्रभारी प्राचार्य
के. जी. मित्तल आयुर्वेद कॉलेज
नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राईव्ह,
तारापोरवाला मत्स्यालय पाठीमागे,
मुंबई - ४०० ००२












K. G. MITTAL AYURVED COLLEGE

प्रभारी प्राचार्य
के. जी. मित्तल आयुर्वेद कॉलेज
नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राईव्ह,
तारापोरवाला मत्स्यालय पाठीमागे,
मुंबई - ४०० ००२.